श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>जाहिर दरपत्रक</u>

दि.२५/०१/२०२३

विषय :—स्वच्छता साहित्य पुरवठा करणेबाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे स्वच्छता विभागा करीता सन २०२३—२४ या कालावधीसाठी स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपलेकडील छापील बिलावर सही व शिक्क्यासह दरपत्रक दि.०२/०२/२०२३ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे.सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

"स्वच्छता साहित्य पुरवठा कामाचे दरपत्रक"

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

स्वा/—
.व्यवस्थापक,
श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with Oken Scanner

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

स्वच्छता साहित्य पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

## माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. नमूना दरपत्रक कार्यालयीन वेळेत श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पंढरपूर येथे व www.vitthalrukminimandir.orgया संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक स्वच्छता साहित्य पुरवठा कामी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक दि.०२/०२/२०२३ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत समक्ष श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले व अपूर्ण दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

२. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने पुरवठा कामाचा आदेश दिले पासून १ वर्षा पर्यंत राहिल या कालावधीत इकडील मागणीप्रमाणे स्वच्छता साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

३. पुरवठा करावयाच्या स्वच्छता साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आवश्यक वस्तूंचा तपशील | अंदाजे वर्षभर आवश्यक माल (किलो/नग/लिटर) |
|---|---|---|
| १ | ब्लिचींग पावडर | ५०० किलो |
| २ | लहान टोच्या पुसणी ५५५ कंपनीचा | २०० नग |
| ३ | मेडिक्लोर | २०० लिटर |
| ४ | वायपर मोठा स्टिल | १०० नग |
| ५ | वायपर लहान | १० नग |
| ६ | ब्लॅक फिनेल | ८०० लिटर |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | १००० लिटर |
| ८ | ॲसिड (एच.सी.एल) | २५० लिटर |
| ९ | ओडोपीक पावडर | २० किलो |
| १० | पांढरी डांबर गोळी | ५ किलो |
| ११ | रंगीत डांबर गोळी | १०० नग |
| १२ | खराटे | २०० नग |
| १३ | झाडू ५५५ कंपनीचा | २०० नग |
| १४ | रूम फ्रेशनर | २० लिटर |
| १५ | तारेची घासणी | ५० नग |
| १६ | वॉशिंग पावडर (निरमा) | ५०० किलो |
| १७ | बायडींग तार | २५ किलो |
| १८ | १०फुटी केरसुणी झाडु (वेळुची काठी असणारा) | १००नग |
| १९ | हॅन्ड वॉश | २०० लिटर |
| २० | कोलीन ५०० मि.ली.ची बोटल | ५० नग |
| २१ | टाईल्स क्लिनर | ५० लिटर |
| २२ | कॉस्टिक सोडा | ५० किलो |

४. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

Scanned with Oken Scanner

५. सर्व साहित्य चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

६. स्वच्छता साहित्य विक्रीची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

९. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१०. स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे ठिकाण श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप विभाग, पंढरपूर येथे करणे आवश्यक आहे.

११. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१३. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २%आयकर व २% जीएसटी कपात केली जाईल.

१४. सदर कामासाठी कोणतीही अ‍ॅडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१५. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१७. निविदा शुल्क रक्कम रू.१७००/— राहिल.तसेच दरपत्रक अर्जा सोबत बयाना रक्कम रू. ८५००/— रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल,त्यांनी पुरवठा आदेश मुल्याचे २ % सुरक्षाठेव जमा करावी लागेल.तसेच त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

२०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

स्वा/—
.व्यवस्थापक,
श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with Oken Scanner

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## दरपत्रक अर्ज

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषयः— स्वच्छता साहित्य पुरवठा करणेकामी दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.————————————————

पूर्ण पत्ता :— ————————————————

————————————————

मोबाईल कं.:— ————————————————

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने स्वच्छता साहित्य पुरवठा कामाच्यादै. ———, सोलापूर मध्ये दि. /०१/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीप्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वच्छता साहित्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील | ब्रँडचे नांव / दर्जा | परिमाण | दर प्रती किलो / नग/लिटर रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | ब्लिचींग पावडर | उत्तम | प्रति किलो | | | |
| २ | लहान टोच्या पुसणी ५५५ कंपनीचा | उत्तम | प्रति नग | | | |
| ३ | मेडिक्लोर | उत्तम | प्रति लिटर | | | |
| ४ | वायपर मोठा स्टिल | उत्तम | प्रति नग | | | |
| ५ | वायपर लहान | उत्तम | प्रति नग | | | |
| ६ | ब्लॅक फिनेल | उत्तम | प्रति लिटर | | | |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | उत्तम | प्रति लिटर | | | |
| ८ | ॲसिड (एच.सी.एल) | उत्तम | प्रति लिटर | | | |
| ९ | ओडोपीक पावडर | उत्तम | प्रति किलो | | | |
| १० | पांढरी डांबर गोळी | उत्तम | प्रति किलो | | | |

Scanned with Oken Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | रंगीत डांबर गोळी | उत्तम | प्रति किलो | | | |
| १२ | खराटे | उत्तम | प्रति नग | | | |
| १३ | झाडू ५५५ कंपनीचा | उत्तम | प्रति नग | | | |
| १४ | रूम फ्रेशनर | उत्तम | प्रति किलो | | | |
| १५ | तारेची घासणी | उत्तम | प्रति नग | | | |
| १६ | वॉशिंग पावडर (निरमा) | उत्तम | प्रति किलो | | | |
| १७ | बायडींग तार | उत्तम | प्रति किलो | | | |
| १८ | १०फुटी केरसुणी झाडु (वेळुची काठी असणारा) | उत्तम | प्रति नग | | | |
| १९ | हॅन्ड वॉश | उत्तम | प्रति नग | | | |
| २० | कोलीन ५०० मि.ची बोटल | उत्तम | प्रति नग | | | |
| २१ | स्टाईल्स क्लिनर | उत्तम | प्रति लिटर | | | |
| २२ | कॉस्टिक सोडा | उत्तम | प्रति किलो | | | |

वरील दर श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. तसेच सदर दराने पुरवठा आदेश दिले पासून १ वर्षा पर्यंतच्या कालावधीत स्वच्छता साहित्य पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र रू.१००/– च्या स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०२३ पुरवठाधारकाची सही व शिक्का

<u>सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत</u>

१. पूर्वी स्वच्छता साहित्य पुरवठा केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
२. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
३. जीएसटी प्रमाणपत्रे
४. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना.
५. पॅन कार्ड.
६. निविदा शुल्क,बयाना रक्कम रोखीने भरलेलेची जमा पावती किंवा डि.डि.

Scanned with Oken Scanner